सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन- कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. - ०२२-२२१६३३५१ ई-मेल - mahapocra@gmail.com

जा. क्र : नादेकृसंप्र ०३२२/ प्र.क्र.३२/ कृषि विद्या /२५२ / २०२५ दि. १८.३.२०२५

प्रति,

१. विभागीय कृषी सह संचालक, छ.संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर, नाशिक.
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे)
३. प्रकल्प संचालक (आत्मा) (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व जिल्हे)
४. उपविभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व उपविभाग)
५. तालुका कृषि अधिकारी, (प्रकल्प टप्पा-२ मधील सर्व तालुके)

**विषय - प्रकल्प टप्पा-२ मधील गावांकरिता आयोजित Online बैठकीस उपस्थित राहणेबाबत . . .**

संदर्भ- या कार्यालयाकडील पत्र क्र. नादेकृसंप्र ०३२२/ प्र.क्र.३२/ कृषि विद्या /२४५ / २०२५ दि. १८.३.२०२५

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ च्या पूर्वतयारी विषयक कामकाज प्रकल्प गावात सुरू झाले असून गावाचे स्थान निश्चिती, ग्रामपंचायत बदल, कृषि सहाय्यक सज्जा बदल, TEAMS portal, GKVS portal, MLP portal, MLP app, water budget App, पेसा गावांसंबंधी करावयाची कार्यवाही, कृषि ताई, स्वयंसेवक निवड इ. विषयक प्रश्न वा अडचणी प्राप्त होत आहेत. सदर अडचणी/ प्रश्न व सूचना याचे तातडीने निराकरण करण्यासाठी **दर आठवड्यात सोमवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी सायंकाळी ५.०० वाजता** प्रकल्प गावांशी संबंधित येणा-या अडचणी सोडविण्यासाठी online बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर online बैठकीस क्षेत्रीय स्तरावरील कोणतेही अधिकारी/ कर्मचारी online बैठकीस उपस्थित राहू शकतात व आपले अडचणी/ प्रश्न व सूचना मांडू शकतात.

संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत केलेनुसार, प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून विषयवार कामकाज पहाणारे अधिकारी/ कर्मचारी सदर online बैठकीस उपस्थित राहून क्षेत्रीय स्तरावरील अडचणी/ प्रश्न व सूचना याची उत्तरे देणार आहेत. online बैठकीची लिंक सोमवार, बुधवार व शुक्रवार सकाळी whatsapp द्वारे देण्यात येईल. सदर लिंक आपले अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी यांना द्यावी व ज्यांना प्रकल्प टप्पा-२ बाबत क्षेत्रीय स्तरावरून सुरू असलेल्या कामकाजाबाबत अडचणी/ प्रश्न व सूचना आहेत, त्यांना सदर बैठकीस उपस्थित राहाणेबाबत सूचित करावे.

क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/ कर्मचारी यांना प्रश्न व अडी-अडचणी दूरध्वनीद्वारे विचारण्यासाठी पुढील दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

१. श्रीम. प्रवीणा गणवीर, सहाय्यक- ७९००१६४३१४ (तांत्रिक प्रश्न)
२. श्रीम. तेजस्विनी शिंत्रे, IT Specialist- ८५९११०३९४६ (IT विषयक प्रश्न)

Parimal 18/3

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक

प्रत- १. प्रकल्प व्यवस्थापन कक्ष अधिकारी व कर्मचारी यांना माहितीसाठी व बैठकीस उपस्थित रहाणेसाठी